# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** मंगळवारी झोन क्र. 10, प्रभाग क्र. 01 अंतर्गत असलेल्या
**{विद्युत विभाग}** आर्य नगर, काळे ले–आऊट तसेच विविध ठिकाणी खांब लावून प्रकाश व्यवस्था करण्याच्या कामाचे प्राकलन तयार करण्यात आले असून प्राकलनिय राशी रू. 29,99,610/– इतकी आहे. या कामास प्रशासकीय मान्यता मिळण्यास्तव तसेच 8 दिवसांची लघु निविदा बोलावून हे काम करण्यास्तव मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :–1) सदर कामाचा खर्च पद क्र. A42301770718 (जुने पद क्र. 712) अंतर्गत करावयाचा आहे.

2) सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 437/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 26/06/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार मंगळवारी झोन क्र. 10, प्रभाग क्र. 01 अंतर्गत असलेल्या आर्य नगर, काळे ले–आऊट तसेच विविध ठिकाणी खांब लावून प्रकाश व्यवस्था करण्याच्या कामाचे प्राकलन तयार करण्यात आले असून प्राकलनिय राशी रू. 29,99,610/– इतकी आहे. या कामास प्रशासकीय मान्यता मिळण्यास्तव तसेच 8 दिवसांची लघु निविदा बोलावून हे काम करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**